अधीक्षक अभियंता व सहसंचालक
महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी
जलसंपदा विभाग, दिंडोरी मार्ग, नाशिक - ४२२ ००४

| | |
|---|---|
| संपर्क:- व्या. परीक्षा -०२५३-२५३ २८७९ | ई-मेल :- pemetansk@gmail.com |
| जा.क्रं. मअप्रप्र/व्या.परीक्षा/(नस्ती क्र.०३/२०२४) / ११९ /२०२४ | दि. २४ /१०/२०२४ |

# परिपत्रक

**विषय-** सहाय्यक अभियंता श्रेणी २/ सहाय्यक अभियंता (राजपत्रित) स्थापत्य/ यांत्रिकी/ विद्युत) व कनिष्ठ अभियंता (अराजपत्रित) (स्थापत्य/ यांत्रिकी/ विद्युत) गट व संवर्गाकरीता - दि. २ व ३ सप्टेंबर २०२४ रोजी आयोजित केलेल्या ऑनलाईन व्यावसायिक परीक्षेच्या **निकालात परीक्षार्थींच्या पदनामांच्या दुरुस्तीबाबत..**

**संदर्भ-**
१) या कार्यालयाचे परिपत्रक जा.क्र. ७५ दि. ३१/०७/२०२४
२) या कार्यालयाचे परिपत्रक जा.क्र. ११५ दि. ११/१०/२०२४

संदर्भ क्र. १ अन्वये गट-व सहाय्यक अभियंता श्रेणी २/ सहाय्यक अभियंता (राजपत्रित) स्थापत्य/ यांत्रिकी/ विद्युत) व कनिष्ठ अभियंता (अराजपत्रित) (स्थापत्य/ यांत्रिकी/ विद्युत) गट व संवर्गाकरीता परिपत्रक जाहीर करण्यात आले होते. सदर परीक्षेसाठी प्रवेश अर्ज ऑनलाईन पध्दतीने मागविण्यात आलेले होते. ऑनलाईन अर्ज भरण्याविषयी सविस्तर सुचना मार्गदर्शक सुचना व कार्यपध्दती परिपत्रकासोबत कळविण्यात आलेल्या होत्या.

परीक्षार्थीनी ऑनलाईन प्रवेश अर्जामध्ये भरलेल्या माहितीनुसार सदर परीक्षेचा निकाल संदर्भ क्र. २ अन्वये जाहीर करण्यात आलेला आहे. त्यानंतर ब-याच परीक्षार्थीनी जाहीर केलेल्या निकालातील पदनामामध्ये दुरुस्ती करणे विषयी ई-मेलद्वारे या कार्यालयास कळविले आहे.

याविषयी कळविण्यात येते की, ज्या परीक्षार्थींच्या निकालात त्यांच्या पदनामामध्ये दुरुस्ती आवश्यक आहे, अशा परीक्षार्थीनी आपला ऑनलाईन अर्ज, निकाल व पदाबाबत आवश्यक कागदपत्रे हे त्यांच्या संबंधित कार्यालयास दाखवावीत व त्यांच्या संबंधित कार्यालयाने सर्व कागदपत्रे तपासून सेवापुस्तकातील नोंदी घेणे व इतर आवश्यक ती कार्यवाही करावी.

(प्र. मो. बावीस्कर)
अधीक्षक अभियंता व सहसंचालक
महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी,
नाशिक

प्रत-
१) मुख्य अभियंता (जलसंपदा/सा.बां.विभाग) व नियंत्रक अधिकारी / अधीक्षक अभियंता / अधीक्षक अभियंता व प्रशासक / मुख्य कार्यकारी अधिकारी / आयुक्त यांना माहितीसाठी कार्यवाहीसाठी सविनय सादर
२) मास्टर फाईल २०२४